कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता / सहायक अभियंता श्रेणी-२ संवर्गातील अभियंत्यांची बदली.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन आदेश क्रमांक- बदली-२०१८/प्र.क्र.९७/२०१८/आ.(शा.अ.)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ३१ मे, २०१८.

शासन आदेश:-

महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम,२००५ मधील कलम ४ (४) आणि ४(५) मधील तरतुदींनुसार मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपूर अंतर्गत कार्यरत शाखा अभियंता यांना नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी (स्तंभ-४ नुसार) सार्वजनिक सेवेच्या हितार्थ विनंतीनुसार बदली करण्यात येत आहे.

अ.क्र.	अभियंत्याचे नाव	सध्या कार्यरत असलेले ठिकाण	विनंतीचे ठिकाण
१	२	३	४
१	श्री.चौहान अमितसिंह कांतिलालसिंह सहा.अभि.श्रे.२	मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपूर अंतर्गत पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण मंडळ, नागपुर अंतर्गत पाटबंधारे व जलविद्युत प्रकल्प अन्वेषण विभाग नागपुर (विभागीय कार्यालय)	मुख्य अभियंता जलसंपदा विभाग, औरंगाबाद अंतर्गत औरंगाबाद मुख्यालय अंतर्गत लघुपाटबंधारे उपविभाग क्र. १ येथे रिक्त पदी

२. आदेशात नमूद अभियंत्यांची ज्या कार्यालयात बदली करण्यात आली आहे, त्या कार्यालयाच्या संबंधित कार्यकारी संचालक/मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता व संचालक यांनी उपरोक्त आदेशातील स्तंभ-४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे संबंधित अभियंत्यांचे सविस्तर पदस्थापनेचे आदेश तात्काळ निर्गमित करावेत.

३. आदेशात नमूद अभियंता ज्या कार्यालयात कार्यरत आहेत, त्या कार्यालयाच्या संबंधित कार्यकारी संचालक /मुख्य अभियंता/ अधीक्षक अभियंता व संचालक यांना कळविण्यात येते की, त्यांनी बदली झालेल्या अभियंत्याचे सविस्तर पदस्थापनेचे आदेश निर्गमित झाल्यानंतरच बदलीच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी त्यांना त्वरित कार्यमुक्त करावे. सविस्तर पदस्थापनेचे आदेश प्राप्त झाल्याशिवाय कार्यमुक्त केल्यास व रिक्त पदाअभावी आदेश कार्यान्वित करण्यास अडचणी उद्भवल्यास संबंधित अभियंत्याला सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी मंजूर करावा लागतो. अशा प्रकरणी संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यास जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

४. संबंधित कार्यकारी संचालक /मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता व संचालक यांना कळविण्यात येते की, शासन स्तरावरील प्रस्तुत आदेश प्रथम कार्यान्वित करुन तद्नंतरच क्षेत्रीय स्तरावरील प्रदेशांतर्गत बदल्यांचे आदेश कार्यान्वित करावेत. शासनाने केलेल्या आदेशात क्षेत्रीय स्तरावर कोणतेही बदल करण्यात येऊ नयेत. पदस्थापनेच्या ठिकाणी पद रिक्त नसेल अथवा अन्य कारणांमुळे बदली कार्यान्वित करण्यास प्रशासकीय अडचण उद्भवत असेल तर, अशा बाबतीत शासनास तात्काळ अवगत करुन अहवाल सादर करावा.

५. संबंधित कार्यकारी संचालक /मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता व संचालक यांना कळविण्यात येते की, त्यांनी वरीलप्रमाणे संबंधित कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/स.अ.श्रेणी-२ यांच्या बदलीची अंमलबजावणी करताना सदर बदलीच्या ठिकाणी कोणत्याही परिस्थितीत मंजूर पदांपेक्षा जास्त कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/सअश्रेणी-२ कार्यरत राहणार नाहीत, याची सर्वार्थाने दक्षता घ्यावी.

६. वरीलप्रमाणे बदली करण्यात येत असलेल्या कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/सहाय्यक अभियंता श्रेणी-२ यांच्या कार्यमुक्ती आदेशासोबत त्यांचे गोपनीय अहवाल, सेवापुस्तक, तसेच अंतिम वेतन प्रमाणपत्र बदली करण्यात आलेल्या नवीन कार्यालयाकडे तात्काळ पाठविण्यात यावे.

७. सदरहू बदली ही विनंती बदली असल्याने उपरोक्त अभियंत्याला बदली विषयक प्रवासभत्ता व इतर अनुषंगिक लाभ अनुज्ञेय असणार नाहीत.

८. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०६०११०५२४५१०२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Arvind Vitthalrao Pagar

Digitally signed by Arvind Vitthalrao Pagar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e73e74e98305e43eb295d08ba37550053b948b587f77b90efdc8b9ff16d8e158, serialNumber=3c4bfae11cba198118c1c28e0ff34686b6c0a82a270584a7daed60418b2f32ca, cn=Arvind Vitthalrao Pagar
Date: 2018.06.01 10:52:49 +05'30'

(अरविंद वि. पगार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत -१) मा. मंत्री (जलसंपदा) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई -३२.
२) मा. राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे कार्यालय , मंत्रालय, मुंबई -३२.
३) प्रधान सचिव (जसं) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.
४) सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.
५) मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपूर
६) मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, औरंगाबाद
७) स.स. (प्रशा), जलसपंदा विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.
८) आ. (शा.अ.) कार्यासन संग्रहार्थ.